महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: fellowshipmahajyoti@gmail.com

जावक क्र. महाज्योती/नागपूर/पीएचडी अधि./२०२३/ दि.

## महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर संस्थेमार्फत देण्यात येणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती-२०२३ करिता प्रवेश पात्रता परीक्षा अभ्यासक्रमाबाबत सूचना

- महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती-२०२३ करिता प्रवेश पात्रता परीक्षा घेण्यात येणार आहे, त्यासाठी UGC-NET, CSIR, ICMR, ICAR व DBT अशा सर्व अभ्यासक्रमाच्या धर्तीवर सामाईक घटकांचा महाज्योतीच्या प्रवेश परीक्षेकरिता अभ्यासक्रमात समावेश करून खालीलप्रमाणे प्रवेश परीक्षेसाठी अभ्यासक्रम तयार करण्यात आलेला होता व महाज्योतीच्या संकेतस्थळावर दि.११.०८.२०२३ रोजी प्रसिद्ध करून याबाबत विद्यार्थ्यांकडून सूचना मागविण्यात आल्या होत्या.
- विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या सूचना विचारात घेऊन पुढीलप्रमाणे परीक्षा घेण्याचे निर्धारित करण्यात आलेले आहे.

## महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती-२०२३ करिता शाखा निहाय जागा वाटपाचे आरक्षण:

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती-२०२३ करिता एकूण मंजूर जागांमध्ये शाखानिहाय खालीलप्रमाणे टक्केवारीच्या प्रमाणात जागा आरक्षित राहतील.

| अ क्र | शाखेचे नाव | एकूण आरक्षित जागांची टक्केवारी |
|---|---|---|
| १. | सामाजिक शास्त्र, आंतरविद्याशाखा, भाषा व इतर | ४०% |
| २. | विज्ञान व तंत्रज्ञान शाखा | ४०% |
| ३. | कृषी शाखा | ५% |
| ४. | वाणिज्य व व्यवस्थापन शाखा | १५% |
| | **एकूण** | **१००%** |

**<u>महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती-२०२३ करिता प्रवेश पात्रता परीक्षेचे स्वरूप:</u>**

१. प्रवेश परीक्षा ही मराठी व इंग्रजी अश्या दोन भाषांमध्ये होईल.
२. बहुपर्यायी पद्धतीने प्रश्नपत्रिका असेल, परीक्षा ही संगणकाच्या सहाय्याने ऑनलाईन स्वरूपाची असेल.
३. कागदपत्रांच्या आधारे पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांचीच परीक्षा घेण्यात येईल.
४. परीक्षेसाठी एकूण १०० प्रश्न असतील, प्रत्येक प्रश्नाला २ गुण या प्रमाणे २०० गुणांची परीक्षा असेल. कोणतेही नकारात्मक गुण असणार नाही.
५. सामाजिक शास्त्र, आंतरविद्याशाखा, भाषा व इतर, विज्ञान व तंत्रज्ञान शाखा, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेतील विद्यार्थ्यांसाठी परीक्षेच्या अभ्यासक्रमाचे घटक व घटकासाठी गुण याचा तपशील खालीलप्रमाणे: (खालील अभ्यासक्रम कृषी शाखेतील विद्यार्थ्यांसाठी नसेल)

| अ क्र | घटकाचे नाव | एकूण प्रश्न संख्या | एकूण गुण संख्या |
|---|---|---|---|
| १. | Teaching Aptitude | १० | २० |
| २. | Research Aptitude | ५० | १०० |
| ३. | Comprehension | १० | २० |
| ४. | Mathematical Reasoning and Aptitude | १० | २० |
| ५. | Information and Communication Technology (ICT) | ५ | १० |
| ६. | Data Interpretation | ५ | १० |
| ७. | Logical Reasoning | १० | २० |
| | **एकूण** | **१००** | **२००** |

६. **कृषी शाखेतील उमेदवारांसाठी** परीक्षा ही **केवळ इंग्रजीत** होईल. परीक्षेसाठी एकूण १०० प्रश्न असतील, प्रत्येक प्रश्नाला २ गुण या प्रमाणे २०० गुणांची परीक्षा असेल. कोणतेही नकारात्मक गुण असणार नाही व खालीलप्रमाणे परीक्षेसाठी अभ्यासक्रम असणार आहे :

| अ क्र | घटकाचे नाव | एकूण प्रश्न संख्या | एकूण गुण संख्या |
|---|---|---|---|
| १. | Research Aptitude | ५० | १०० |
| २. | सामान्य कृषी घटक | ५० | १०० |
| | **एकूण** | **१००** | **२००** |

७. परीक्षा ही महाराष्ट्रातील परीक्षा केंद्रांवर होईल, परीक्षा केंद्र निवडण्याची सोय विद्यार्थ्यांना त्यांच्या Profile वर परीक्षेसाठी पात्र विद्यार्थ्यांची यादी प्रसिद्ध केल्यावर उपलब्ध करून देण्यात येईल. याबाबतची सूचना ही केवळ महाज्योतीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

८. परीक्षेसाठी प्रवेश पत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक, मॉक टेस्टचा दिनांक व परीक्षेचा दिनांक याबाबत वेळापत्रक केवळ महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

९. परीक्षेला अनुपस्थित विद्यार्थी हा प्रक्रियेतून बाद ठरेल.

तरी वरील सूचनेची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व
प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर.